कार्यालय पोलीस ठाणे ता.अंबड जि.जालना

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** जालना **P.S.(ठाणे):** अंबड

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0026 **Year (वर्ष):** 2025

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 16/01/2025 00:41

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** बुधवार **Date From (दिनांक पासून):** 15/01/2025

**Time Period (कालावधी):** पहर 6 **Date To ( दिनांक पर्यंत):** 15/01/2025

**Time From (वेळेपासून):** 16:35 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 16:35 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 16/01/2025 **Time (वेळ):** 00:18 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 003

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 16/01/2025 00:18 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पूर्व, 01 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, उप विभाग अंबड कार्यालयातील ,अतिरिक्त कार्यकारी अभियंता यां

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): संभाजी दुर्गादास गुढे
(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :
(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1987
(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत
(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):
(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):
**Date of Issue** (दिल्याची तारीख):
**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):
(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | गुढेनगर अंबड ताअंबड जिजालना,अंबड ,जालना,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | गुढेनगर अंबड ताअंबड जिजालना,अंबड ,जालना,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):
(j) **Phone number** (फोन नं.):
**Mobile** (मोबाइल नं.): 91-9822015532

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | प्रकाश रामकष्ण तौर | | | 1. प्लट नंबर 3, वासुदेव संकुल, , सहयोग नगर, गारखेडा परिसर, ,छत्रपती संभाजीनगर,अंबड , जालना,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 40,000/ रुपये लाचेची रक्कम | 40,000.00 |

| **S.No.** (अ.क्र.) | **Property Category** (मालमत्ता वर्ग) | **Property Type** (मालमत्ता प्रकार) | **Description** (वर्णन) | **Value(In Rs/-)** (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| | | | न्थ्रासिन पावडर लागलेली | |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(**चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य **(**रू. मध्ये**)):**

40,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., If any**
**(**इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात **मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| **S.No.** (अ.क्र.) | **UIDB Number** (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

दिनांक 15.01.2025.

फिर्याद

मी संभाजी दुर्गादास गुढे वय **38 वर्ष व्यवसाय गुत्तेदारी रा.गुढेनगर अंबड ता.अंबड** जि.जालना मो.क्र. 9822015532, ई-मेल आयडी-**sdgude@gmail.com.**

समक्ष ॲन्टी करप्शन ब्युरो **जालना येथे हजर येवून फिर्याद देतो की, मी दिनांक** 15.01.2025 रोजी ॲन्टी करप्शन ब्युरो जालना येथे **हजर राहुन तक्रार दिली होती की, मी वरील ठिकाणी कुटुं**बासह राहत असुन मी महावितरण कंपनी चे **खाजगी गुत्तेदारी पध्दतीने कामे करतो.**

माझा मित्र राहुल शंकरराव **मुंढे रा.विकास नगर अंबड यांचे रुद्रा इलेक्ट्रीकल इंडस्ट्रीज** अंबड या नावाने महावितरण कंपनीचे सरकारी **गुत्तेदार असुन ते मोठ मोठे कामे घेत असतो. अंबड तालुक्यातील डीटी**सी मेंटेनन्स व ट्रान्सस्पोर्टीनेशन **चे काम त्यांने मला दिनांक 14.08.2024 रोजी करारनामा करुन** दिलेले आहे.

मी वर नमुद कामा अंतर्गत **अंबड तालुक्यातील 79 ट्रान्सफार्मर बदलण्याचे व दुरुस्ती कर**ण्याचे काम केले आहे. सदर कामाचे 3,32,980/- रुपये **व 18% प्रमाणे** जीएसटी **59,936/-रुपये असे एकु**ण 3,92,916/- रुपये चे बील झालेले आहे. मी सदरचे बील बनवुन मंजुरी करीता दिनांक **30.12.2024 रोजी** अतीरिक्त कार्यकारी अंभियता, महाराष्ट राज्य विद्युत मंडळ, **उप विभाग अंबड यांचे कार्यालयात दाखल केले** होते.

त्यानंतर मी वेळोवेळी अतीरिक्त **कार्यकारी अंभियता, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, उप** विभाग अंबड येथे जावुन अतीरिक्त कार्यकारी **अंभियता प्रकाश तौर यांना भेटुन माझ्या बिला बाबत त्यांच्या कडे चौ**कशी केली असता ते माझे बिलात जाणुन बुजुन **काहीतरी त्रुटी काढुन मंजुरीसाठी वरिष्ठ कार्यालयात पाठविण्यास टा**ळाटाळ करत होते.

त्यानंतर दिनांक **15.01.2025 रोजी सकाळी मी व माझा मित्र राहुल मुंढे असे आम्ही दो**घांनी महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, उप विभाग **अंबड येथे अतिरीक्त** कार्यकारी **अभियंता प्रकाश तौर यांची भेट** घेतली. त्यावेळी अतिरीक्त कार्यकारी अभियंता **प्रकाश तौर यांनी माझा मित्र राहुल मुंढे याचे समक्ष मी केलेल्या कामाचे** बिल वरिष्ठ कार्यालयात मंजुरी करीता पाठविण्यासाठी **50,000/-रुपयाची मागणी केली. त्यावेळी मी त्यांना नाईला**जाने होकार देवुन थोडया वेळाने आणुन देतो **असे म्हणुन आम्ही तेथुन निघुन आलो.**

माझ्या कडे अतिरीक्त **कार्यकारी अभियंता प्रकाश तौर यांनी मागणी केलेले पैसे हे लाच असल्या**ची माझी खात्री झाल्याने मी लगेच **ॲन्टी करप्शन ब्युरो जालना येथे तक्रार देण्यासाठी हजर आलो आहे.**

मला अतिरीक्त कार्यकारी **अभियंता प्रकाश तौर यांना लाच देण्याची इच्छा नाही. त्यांची व** माझी वैयक्तिक दुश्मनी नाही किंवा त्यांचा माझा देण्या **घेण्याचा कोणताही आर्थिक व्यवहार नाही. मी जर त्यांना** लाच दिली नाही तर ते माझे बिल मंजुरीसाठी **वरिष्ठ कार्यालयात पाठविणार नाही.**

मी आज दिनांक 15.01**.2025 रोजी अतिरीक्त कार्यकारी अभियंता प्रकाश तौर यांची महाराष्ट** राज्य विद्युत मंडळ, उप विभाग अंबड कार्यालयात **जावुन भेट घेऊन मी केलेल्या कामाचे बिला संदर्भात बोलणार** आहे. त्यावेळी त्यांनी मला लाचेची मागणी करुन **स्वत: किंवा इतरां मार्फत स्विकारल्यास कायदेशीर कारवाई करावी** ही विनंती अशा मजकुराची तक्रार दिली **होती. माझ्या दिलेल्या तक्रारी वरुन ॲन्टी करप्शन ब्युरो जालना येथील** पोलीस निरीक्षक घरबुडे साहेब यांनी दोन **शासकिय पंचाना बोलावुन माझी व पंचाची ओळख करुन देवुन माझी** तक्रार त्यांना दाखवली. मी दिलेल्या **लेखी तक्रारीवर मी, पंचानी व श्री.घरबुडे साहेब यांनी सह्या केल्या.**

मी अतीरिक्त कार्यकारी अंभियता प्रकाश तौर, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, उप विभाग अंबड यांचे यांचे विरुध्द दिलेली तक्रार खरी आहे काय ? ते माझ्या कडे लाच मागतात काय? याची खात्री करण्यासाठी दिनांक 15.01.2025 रोजी श्री.घरबुडे साहेब, दोन्ही पंच व सापळा पथक असे सरकारी वाहनाने व मी माझ्या कडील चार चाकी कार क्रमांक एम.एच 20 सी.एस 8114 रवाना होऊन जालना ते अंबड जाणारे रोडवरील पारनेर फाटया जवळील गजानन महाराज मंदीर परिसरात थांबलो. त्याठिकाणी श्री.घरबुडे साहेबांनी मला, पंचाना व सापळा पथकास सूचना देवुन पोलीस अंमलदार श्री.शेख यांनी व्हाईस रेकॉर्डर मशीन मध्ये एक नविन मेमरी कार्ड टाकुन त्यामध्ये पूर्वीचे कोणतेही संभाषण नसल्याची खात्री करुन दिली. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर मशीन सुरु करुन त्यामध्ये माझे, दोन्ही पंचाचे व श्री.घरबुडे साहेब यांचे वक्तव्य घेऊन एका कापडी पिशवीत टाकुन माझ्या शर्ट चे आतुन बनीयानला व्हाईस रेकॉर्डर मशीन बांधुन मला पंच क्र.1 दुबळकर यांचे सोबत माझ्या कडील कारने अभियता प्रकाश तौर यांना भेटण्यासाठी महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, उप विभाग अंबड येथे पाठविण्यात आले.

मी व पंच क्र.1 दुबळकर असे महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, उप विभाग अंबड चे कार्यालया समोर रोडचे बाजुला उभी करुन पायी चालत महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, उप विभाग अंबड कार्यालयात गेलो.तेव्हा अभियंता प्रकाश तौर यांचे कक्षात लोकांची गर्दी असल्याने मी कक्षाचे बाहेर कार्यालयात थांबलो. त्यानंतर थोडया वेळाने त्यांचे कक्षातील लोक निघुन गेल्या नंतर मी त्यांना सर येऊ मध्ये असे म्हणालो असता प्रकाश तौर यांनी होकार दिल्याने मी व पंच श्री.दुबळकर त्यांचे कक्षात गेलो. त्यानंतर माझी व प्रकाश तौर यांची माझा कामा संबधाने चर्चा झाली. आमचे चर्चे दरम्यान पंच श्री. दुबळकर यांचे समक्ष अतिरिक्त कार्यकारी अभियंता प्रकाश तौर हे म्हणाले की, बोललो ना मी, सकाळीच बोललो मी, बरोबर हे तुमचे केलं ते माझा काही म्हणणं नाही, या पस्तीसच्या बाबतीत काही म्हणणं नाही असे म्हणाले असता त्यावर मी नही ओ चाळीस इक हजार रुपये प्लीज असे म्हणालो. त्यावर प्रकाश तौर हे बघा जे हाये असे म्हणाले असता त्यावर मी नही सर आज तुमच्या नेतृत्वाखाली काम करायचं सर पुढच्या वेळी करतोना सर मी आता मला दहा लाखाचं ऑर्डर आहे सर असे म्हणालो. त्यावर प्रकाश तौर हे ठिक हे असे म्हणाले असता त्यावर मी आ असे म्हणालो. त्यावर प्रकाश तौर चालल असे म्हणाल्याने मी व पंच क्र.1 दुबळकर असे आम्ही जालना ते अंबड जाणारे रोडवरील पारनेर फाटया जवळील गजानन महाराज मंदीर परिसरात परत आलो. तेव्हा माझे जवळील व्हाईस रेकॉर्डर श्री.घरबुडे साहेबांच्या सांगणे वरुन पोलीस अंमलदार श्री.शेख यांनी बंद केला. व्हाईस रेकॉर्डर मध्ये रेकॉर्ड झालेले संभाषण श्री.घरबुडे साहेबांनी माझ्या व पंचा समक्ष ऐकले.त्यामध्ये अतीरिक्त कार्यकारी अभियता प्रकाश तौर, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, उप विभाग अंबड यांनी तक्रारदार यांनी केलेल्या कामचे बील मंजुरी करीता वरिष्ठ कार्यालयात पाठविण्यासाठी 50,000/-रुपये लाचेची मागणी करुन तडजोडी अंती 40,000/- रुपये स्विकारण्याचे मान्य केल्याचे लाच पडताळणी कारवाई दरम्यान निष्पन्न झाले. त्याबाबत तसा पंचनामा करण्यात आला.

त्यावरुन अतीरिक्त कार्यकारी अंभियता प्रकाश तौर, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, उप विभाग अंबड यांचे विरुध्द दिनांक 15.01.2025 रोजी महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, उप विभाग अंबड येथे सापळा लावण्याचे ठरविण्यात आले. त्यानंतर श्री.घरबुडे साहेबांच्या सूचने वरुन सरकारी वाहनात पोलीस अंमलदार श्री.बुजाडे यांनी अंथ्रासीन पावडरची व अल्ट्राव्हायलेट लाईटच्या गुणधर्माची माहीती देवुन मला व पंचांना त्याचे प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. अतीरिक्त कार्यकारी अंभियता प्रकाश तौर यांना लाच म्हणुन देण्यासाठी माझ्या कडील 40,000/- रुपये ज्यामध्ये पाचशे रुपये दराच्या 80 नोटांचे नंबर व वर्णन लिहुन घेऊन सदर नोटांना रक्कमेला अँथ्रासीन पावडर लावली. प्रकाश तौर हे लोकांकडुन पैसे घेतांना लिफाप्यातच पैसे घेत असल्याने सदरील अँथ्रासीन पावडर लावलेले नोटा एका लिफाप्यात टाकुन सदर लिफाप्यावर सुध्दा अँथ्रासीन पावडर लावुन सदरचा लिफाफा माझ्या पॅन्टचे समोरील उजव्या खिशात ठेवला. श्री.घरबुडे साहेबांनी मला व पंचाना सविस्तर सुचना देवुन प्रकाश तौर यांनी लाच स्विकारल्या नंतर कार्यालयाचे बाहेर आवारात येऊन डाव्या हाताने रुमालाने चेहरा पुसण्याचा इशारा करणे बाबत मला सूचना दिली. तसेच सापळा टिम मधील सर्वांना त्यांचे काम समजावुन सांगुन सूचना देण्यात आल्या. पोलीस अंमलदार श्री.बुजाडे यांना सापळा पथकातुन वगळुन पंच क्र.2 सतिष मगर यांच्या सोबत राहण्याची सुचना दिली. त्याबाबत तसा पंचनामा करण्यात आला.

त्यानंतर श्री.घरबुडे साहेबांच्या सूचने वरुन पोलीस अंमलदार श्री.शेख यांनी व्हाईस रेकॉर्डर मशीन सुरु करुन एका कापडी पिशवीत टाकुन माझ्या शर्टच्या आतुन बनीयानचे बंधाला बांधुन दिली. मला व पंच क्र.1 दुबळकर यांना अभियंता प्रकाश तौर यांना भेटण्यासाठी महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, उप विभाग अंबड येथे पाठविले. मी व पंच क्र. 1 दुबळकर असे आम्ही माझ्या कडील कारने महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, उप विभाग अंबड कार्यालयाच्या समोर रोडच्या बाजुला थांबलो. माझ्या पाठीमागे श्री.घरबुडे साहेब हे त्यांचे सापळा पथक व पंच क्र.2 यांचे सह सरकारी वाहनाने महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, उप विभाग अंबड येथील परिसरात आले व एकमेकांना दिसतील अशा रितीने

परिसरात सापळा लावून थांबले.

मी व पंच क्र.1 दुबळकर असे आम्ही अभियंता प्रकाश तौर यांना भेटण्यासाठी पायी चालत महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, उप विभाग अंबड कार्यालयात जावुन त्यांचे कक्षाचे बाहेरुन त्यांना सर येऊ का आत असे विचारले असता कक्षात लोकांची गर्दी असल्याने त्यांनी मला कक्षाचे बाहेर थांबण्यास सांगितले. त्यानंतर अंदाजे एक तासाने मी व पंच क्र.1 दुबळकर असे आम्ही पुन्हा अभियंता प्रकाश तौर यांच्या कक्षाचे बाहेर जावुन सर येऊ का मध्ये असे विचारले असता त्यांनी होकार दिल्याने मी व पंच क्र.1 दुबळकर असे आम्ही त्यांचे कक्षात जावुन बसलो. त्यानंतर अभियंता प्रकाश तौर हे या, या, आणले तुम्ही असे म्हणाले असता त्यावर मी झाले सर असे म्हणालो असता त्यावर प्रकाश तौर हे उद्या होईल असे म्हणाले. त्यावर मी देऊ सर असे म्हणुन मी माझ्या उजव्या हाताने पॅन्टच्या समोरील उजव्या खिश्यातुन अॅन्थ्रासिन पावडर लावलेले 40,000/- रुपये ठेवलेला लिफाफा बाहेर काढुन अभियंता प्रकाश तौर हयांचे समोर धरला असता त्यावर त्यांनी किती हे असे म्हणुन त्यांचे डाव्या हाताने लाचेची रक्कम ठेवलेला लिफाफा घेवून त्यांच्या टेबलच्या ड्रावर मध्ये ठेवला. त्यावर मी चाळीस हे सर पुर्ण आ असे म्हणालो असता त्यावर प्रकाश तौर हे ठिक हे असे म्हणाले. त्यावर त्यांची व माझी कामा संबंधी चर्चा झाली. त्यानंतर मी व पंच क्र.1 दुबळकर असे आम्ही सदर कक्षातुन बाहेर येऊन कार्यालयाच्या आवारात आलो असता मी ठरल्या प्रमाणे लाचेची रक्कम स्विकारल्याचा पूर्वनियोजित इशारा केला. ती वेळ दुपारी अंदाजे साडे चार वाजेची होती. त्यानंतर सापळा पथक सक्रीय होवून पंच क्रं.2 सतिष मगर यांचे सह त्या ठिकाणी आले. श्री.घरबुडे साहेबांच्या सूचने वरुन पोलीस अंमलदार श्री.शेख यांनी माझ्या कडील व्हाईस रेकॉर्डर मशीन ताब्यात घेऊन बंद केली. त्यानंतर श्री.घरबुडे साहेबांनी पंच क्र.1 दुबळकर यांना लाचेची रक्कम कोणी मागितली व कोणी स्विकारली असे विचारले असता पंच क्र. 1 दुबळकर यांनी महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, उप विभाग अंबड कार्यालयातील अतिरिक्त कार्यकारी अभियंता यांच्या कक्षात हजर असलेल्या एका इसमा कडे अंगुली निर्देश करुन हेच अतिरिक्त कार्यकारी अभियंता प्रकाश तौर हयांनी तक्रारदार यांच्या कडुन डाव्या हाताने लाचेची रक्कम ठेवलेला लिफाफा स्विकारुन त्यांच्या टेबलच्या ड्रावर मध्ये ठेवला आहे असे सांगितल्याने अतिरिक्त कार्यकारी अभियंता प्रकाश तौर यांना पंचा समक्ष लाचेच्या रक्कमेसह जागेवर पकडले. त्यानंतर श्री.घरबुडे साहेबांनी त्यांची, पंचाची व सापळा पथकाची ओळख करुन दिली. त्यानंतर अतिरिक्त कार्यकारी अभियंता प्रकाश तौर यांना त्यांचे नाव गाव पत्ता विचारले असता त्यांनी त्यांचे नाव प्रकाश रामकृष्ण तौर, वय 53 वर्षे, व्यवसाय- नोकरी, अतिरिक्त कार्यकारी अभियंता (सीसी टी एन एस प्रणाली मध्ये केवळ 8000 शब्द संख्या मर्यादा असल्याने उर्वरीत फिर्याद वेगळ्या पेजवर सोबत जोडण्यात येत आहे )

13. **Action taken: Since the above Information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the Investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

SATISH SHIVAJI JADHAV(I (Inspector)) / PI **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

**Rank** (पद): **No.(क्र.):**

**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or** (किंवा)

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / Informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पो.ठाणे अमलदार
पो.स्टे. अंबड

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name (नाव):** SATISH SHIVAJI

**Rank(पद):** I (Inspector)

**No.(सं.):** PI

नेमणुक महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, उप विभाग अंबड रा.प्लॉट नंबर 3, वासुदेव संकुल, सहयोग नगर, गारखेडा परिसर, छत्रपती संभाजीनगर असे सांगीतले.अतिरिक्त कार्यकारी अभियंता प्रकाश तौर यांना स्विकारलेली रक्कम कोठे ठेवली असे विचारले असता त्यांनी त्यांचे टेबलच्या ड्रावर मध्ये ठेवल्याचे सांगितल्याने पंच क्र.2 मगर यांनी टेबलच्या ड्रावर मधुन लाचेचे 40,000/- रुपये ठेवलेला लिफाफा काढुन घेवुन त्यामधील नोटांचे क्रमांक व सापळापुर्व पंचनाम्यातील नोटांचे क्रमांक एकच असल्याची खात्री केली. त्यानंतर सदर कक्षातील लाईट खिडक्या बंद करुन काळया कपडयाच्या सहायाने अंधार करुन श्री.घरबुडे साहेबांनी अल्ट्राव्हायलेट बॅटरीच्या सहायाने अतिरिक्त कार्यकारी अभियंता प्रकाश तौर याचे हात, ड्रावर, लिफाफा व लाचेच्या नोटा चेक केल्या असता अतिरिक्त कार्यकारी अभियंता प्रकाश तौर यांचे डाव्या हाताचे बोटावर, ड्रावरच्या आतमध्ये, लिफाफयाचे वरील व आतील बाजुस तसेच लाचेच्या नोटावर ठिक ठिकाणी हिरवट रंगाची चकाकी दिसुन आली. त्यानंतर सदर लाचेची रक्कम व लिफाफा पंचा समक्ष लाख सिल मोहर करुन जप्त करण्यात आले. तसेच माझे हात व अंगावरील कपडे अल्ट्राव्हायलेट बॅटरीच्या सहायाने चेक केले असता माझे उजव्या हाताचे बोटावर व अंगातील पॅन्टच्या समोरील उजव्या बाजुच्या खिश्याच्या तोंडावर व आतमध्ये ठिक ठिकाणी हिरवट रंगाची चकाकी दिसुन आली. त्यानंतर अतिरिक्त कार्यकारी अभियंता प्रकाश तौर यांच्या टेबल वरुन माझ्या कामकाजाच्या संदर्भाचे कागदपत्र ताब्यात घेण्यात आले. त्यानंतर श्री.घरबुडे साहेब, सापळा पथक, दोन्ही पंच, मी व अतिरिक्त कार्यकारी अभियंता प्रकाश तौर असे आम्ही अॅन्टी करप्शन ब्युरो जालना कार्यालयात आलो. त्याबाबत तसा पंचनामा करण्यात आला.

तरी आज दिनांक 15.01.2025 रोजी आलोसे प्रकाश तौर अतिरिक्त कार्यकारी अभियंता यांनी मी केलेल्या कामाचे बील मंजुरी करीता वरिष्ठ कार्यालयात पाठविण्यासाठी 50,000/- रुपये लाचेची मागणी करुन तडजोडी अंती 40,000/- रुपये स्विकारण्याचे मान्य करुन लाचेची रक्कम आज दिनांक 15.01.2025 रोजी 16.35 वाजेच्या सुमारास महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, उप विभाग अंबड येथे स्वत: स्विकारली म्हणुन त्यांचे विरुध्द कायदेशीर कारवाई करण्यात यावी ही विनंती.

मी दिलेली फिर्याद माझे सांगणे प्रमाणे संगणकावर टंकलीखीत केली असुन त्याची प्रिंट काढल्या नंतर मी वाचुन पाहिली. ती माझे सांगणे प्रमाणे बरोबर व खरी आहे.

पो.ठाणे अ.
पो.स्टे अंबड

ही फिर्याद दिली सही